Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेस नोट ता.२४/०२/२०२०**

**देशी बनावटीचे पिस्टल व जिवंत काडतुस बाळगणारा एक इसमास अटक**

**गुन्हे शाखा, युनिट-5 ची कारवाई**

दि 18/02/2019 रोजी मा वरिष्ठांचे आदेशान्वये सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे व गुन्हे शाखा, युनिट 5 कडील पोलीस कर्मचारी हे खासगी चारचाकी वाहनाने पेट्रोलींग करीत असताना पोलीस कर्मचारी दत्तात्रय बनसुडे व फारुक मुल्ला यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, एक इसम आंबी चौकामध्ये शिवमल्हार हॉटेलचे समोर त्याचेकडे असलेले देशी बनावटीचे पिस्टल विक्रीकरीता येणार आहे. अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे यांनी सोबतचे कर्मचारी यांना सुचना देवून आंबी चौक येथे सापळा लावला असता बातमीप्रमाणे संशयीत इसम रिक्षाने आंबी चौक येथे येवून थांबला. त्याला पोलीसांचा सुगावा लागताच त्याने पळुन जाण्याचा प्रयत्न केला असता त्याला पोलीस स्टाफचे मदतीने शिताफीने ताब्यात घेवून नाव व पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव मोनु रसिले वर्मा वय 19 वर्षे धंदा कुक, रा म्हाळसाकांत चौक, निगडी पुणे मुळ रा मु.पो. साकीपुर, दत्तनगर तहसिल तरफगंज जि गोंडा उत्तर प्रदेश असे असल्याचे सांगितले. त्याची पंचांसमक्ष झडती घेतली असता त्याचे कमरेस डावे बाजुस पॅन्टमध्ये खोचलेले एक देशी बनावटीचे पिस्टल मॅक्झीनसह मिळुन आले तर त्याचे पॅन्टचे डावे खिशामध्ये एक जिवंत काडतूस असा एकुण 51,500/- किंमतीचा मुद्देमाल मिळुन आला. आरोपी मोनु वर्मा याचेकडे मिळुन आलेले पिस्टल व जिवंत काडतुस जवळ बाळगण्याचा परवाना आहे अगर कसे या बाबत विचारणा केली असता त्याने प्रथम उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली त्यास गुन्हे शाखा, युनिट 5 कार्यालय येथे नेवून सखोल तपास करता त्याने त्याचेकडे कोणत्याही प्रकारचा अग्निशस्त्र बाळगण्याचा परवाना नसल्याचे सांगुन सदर पिस्टल व जिवंत काडतुस हि विक्री करण्याकरीता आणल्याचे सांगितले.

सदर आरोपीवर तळेगाव MIDC पोलीस स्टेशन गु.र.नं. 25/2020 भारतीय शस्त्र अधिनियम 1959 चे कलम 3(25) सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम 37 (1) (3) सह 135 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे, गुन्हे शाखा, युनिट 5 करीत आहेत. सदर आरोपी हा आज रोजीपर्यंत पोलीस कोठडीमध्ये होता.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. संदीप बिष्णोई, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुकत, गुन्हे मा. श्री सुधिर हिरेमठ, सहा पोलीस आयुक्त गुन्हे 1 मा. श्री राजाराम पाटील, सहा पोलीस आयुक्त गुन्हे 2 मा. श्री श्रीधर जाधव, गुन्हे शाखा, युनिट-5 चे पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांचे मार्गदर्शनाखाली, सहा पोलीस निरीक्षक श्री राम गोमारे व पोलीस कर्मचारी दत्तात्रय बनसुडे, फारुक मुल्ला, मयुर वाडकर, संदिप ठाकरे, धनराज किरनाळे, गणेश मालुसरे, सावन राठोड, दयानंद खेडकर, ज्ञानेश्वर गाडेकर, धनंजय भोसले, स्वामीनाथ जाधव, भरत माने, गोपाळ ब्रम्हांदे, सुखदेव गावंडे, राजेंद्र शेटे व नागेश माळी यांनी केली आहे.


गुन्हे शाखा, युनिट-५,
पिंपरी-चिंचवड.